सूचना का अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२०/M/०००४८२**

**अपिलार्थी श्रीमती प. गं. कोदरकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी (१६ अ)**
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ३२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप सचिव**
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ३२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २१.०६.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित (ट्रॅकिंग रिपोर्टप्रमाणे दि. १४.०६.२०२४ रोजी नोटीस प्राप्त झाली आहे.)
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १९.११.२०१९ | - | ०३.०१.२०२० | १३.०२.२०२० |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १०.०२.२०२० रोजीच्या अर्जांन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश मिळालेले नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी दि. १९.११.२०१९ रोजीच्या माहिती अर्जानुसार शासनाने रिट पिटिशन क्र. १२०६३/२०१५ मध्ये दि. ०२.०१.२०१७ रोजी मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे सादर केलेले प्रतिज्ञापत्राविषयी माहिती व खुलासा याबद्दल माहिती विचारली आहे. जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थींनी दि. ०३.०१.२०२० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. १३.०२.२०२० रोजी असे नमुद केले की, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे तसेच एखाद्या बाबीचा खुलासा करणे माहितीचा अधिकार नियमानुसार अभिप्रेत नाही. सबब अपील फेटाळण्यात येत आहे.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे निवेदन दि. २१.०६.२०२४ आयोगासमोर सादर केले. ते अभिलेखावर घेण्यात आले. त्यामध्ये त्यांनी नमुद केले की, प्रथम अपील सुनावणी दि.२४.०१.२०२० रोजी ठेवण्यात आली होती. अपिलार्थी अनुपस्थित असल्याची बाब विचारात घेता दि.१३.०२.२०२० रोजी प्रथम अपील आदेश पारीत केलेले आहेत.

..२/-

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश ७ दिवसांत नोंदणीकृत टपालाने पाठवावे.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २४.०६.२०२४**

State Information Commission
Greater Mumbai

प्रदीप व्यास
26-6-2024

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**